**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१००/२०२२**
**निशाणी क्र.२३ क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :– | संजय संभाजीराव पवार , |
| वय | :– | ५५ वर्ष, |
| व्यवसाय | :– | शिक्षक, |
| राहणार | :– | शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

..............................................................................................................

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. जी.एम.बागुल यांचे मार्फत.**

दि. ०३ जानेवारी २०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता खानसिंग जिभाऊ चौक, शिंदखेडा याठिकाणी बोलावले होते. त्याठिकाणी मी बघितले की, तेथे काचा फोडलेल्या होत्या व तोडफोड केलेली होती. त्याठिकाणी नाईट लॅम्प, सीसीटीव्ही फोडलेले दिसत होते व दगड पडलेले दिसत होते. आता मला प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यातील अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्याला **नि.क्र.२४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.डी.सोनवणे यांचे मार्फत**

हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी विजयसिंग नथेसिंग राजपुत यांच्या संस्थेत मी शिक्षक म्हणुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील आरोपी राजेंद्रसिंग नथेसिंग राजपुत हे फिर्यादीचे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील इतर आरोपी हे फिर्यादीचे पुतणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खानसिंग जिभाऊ चौक हे ज्या नावाने आहे ते खानसिंग जिभाऊ हे माजी आमदार व लोकनेते होते. हे म्हणणे खरे आहे की, खानसिंग जिभाऊ यांच्या मृत्यु नंतर त्यांच्या संपत्ती विषयी वाद निर्माण झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना काहीएक मुलबाळ नव्हते. त्यामुळेच प्रस्तुत खटल्यातील

फिर्यादी तसेच आरोपी राजेंद्र नथेसिंग राजपुत यांच्यात वाद निर्माण झाले किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील आरोपी क्र.१ राजेंद्र नथेसिंग राजपुत हे देखील फिर्यादीच्या संस्थेत नोकरीस आहेत. फिर्यादीने आपल्याच संस्थेतील शिक्षंकांविरुध्द भा.दं.वि. कलम ३७९ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ब–याच वेळेला कोर्टात येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने गावातील तसेच संस्थेतील ब–याच लोकांविरुध्द केसेस दाखल केल्या आहेत त्यानिमित्त ते कोर्टात येत असतात.

मी यापुर्वी न्यायालयात आलेलो नाही. मला प्रस्तुत खटल्याकामी पंचनामा करण्यासाठी फिर्यादीने फोन करुन घटनेच्या दुस–या दिवशी बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनाम्याकरीता येण्याकामी समन्स दिले नव्हते किंवा बोलावले नव्हते. पंचनामा कोणत्या पोलिसांनी लिहुन ठेवला त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी हे संस्थेचे चेअरमन असल्यामुळे त्यांच्याकडे माझे नेहमी येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी संस्थेचा कर्मचारी असल्यामुळे फिर्यादीने जे काम सांगितले व जेथे बोलावले तेथे मला जावे लागते. पंचनामा साधारणतः एक ते दिड तास चालला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीसांनी माझ्या पंचनाम्यावर सह्या घेतल्या.

हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घरासमोर लोकवस्ती आहे. मी शिंदखेड्यात लालचंद नगर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घरासमोर चौधरी समाजाच्या व्यक्तीचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्याच शेजारी पी.एन.पाटील सरांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे भिंतीला लागुन उत्तर बाजुला सुनिल सोनवणे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी यांचे घराला पुर्व बाजुला व दक्षिण बाजुला असे दोन दरवाजे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घराच्या पश्चिमेला राजु बोरसे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घराच्या दक्षिणेला शिंपी मंगल कार्यालय आहे. हे म्हणणे खरे आहे की, काही अंतरावर पुर्वे कडे दिक्षित सरांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घरापासुन दक्षिणेकडे सर्व राजपुत समाजाच्या लोकांची घरे आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर की, दि. ०३ जानेवारी २०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता खानसिंग जिभाऊ चौक, शिंदखेडा याठिकाणी बोलावले होते. त्याठिकाणी मी बघितले की, तेथे काचा फोडलेल्या होत्या व तोडफोड केलेली होती. त्याठिकाणी नाईट लॅम्प, सीसीटीव्ही फोडलेले दिसत होते व दगड पडलेले दिसत होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही व दोन्ही पंचनाम्याकामी मी घटनास्थळी गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या संस्थेत कार्यरत असल्याने फिर्यादीला मदत व्हावी यासाठी आजरोजी मी न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/---
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०६/०१/२०२५